Tel No. : (022) -2363 2343
Fax No. : (022) -2363 3272/2363 6818
Website : rajbhavan-maharashtra.gov.in
Email : usa.rb-mh@nic.in
: secy.rb-mh@nic.in

सत्यमेव जयते

Raj Bhavan Secretariat
राज भवन सचिवालय
Walkeshwar Road, Malabar Hill, Mumbai-400 035
वाळकेश्वर रोड मुंबई ,मलबार हिल , ४०००३५
MAHARASHTRA महाराष्ट्र

जाहिरात क्र. रा.स.का./२०२१/निर्लेखन/प्र.क्र.३७४/२४११ दि. ५ सप्टेंबर २०२२

# दुचाकी वाहन विक्री निविदा

राज्यपाल सचिव कार्यालयाची खाली नमूद केलेली दुचाकी वाहने "**जसे आहे, जेथे आहे तसेच**" निकाली काढण्यासाठी इच्छुक व्यक्ती/संस्था यांच्याकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (परिशिष्ट-१)सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | वाहनाचा क्रमांक | वाहन खरेदीची तारीख | कंपनी /मॉडेल | इंधन | धावसंख्या (किलोमीटर्स) |
|---|---|---|---|---|---|
| १ | MH-01-AN-0026 | २६ ऑक्टोंबर २०१० | होंडा अॅक्टीवा | पेट्रोल | 51,492 Km. |
| २ | MH-01-AN-0027 | २६ ऑक्टोंबर २०१० | होंडा अॅक्टीवा | पेट्रोल | 48,840 Km. |

सदर मोटार सायकली राज्यपाल सचिव कार्यालय, वाळकेश्वर मार्ग, मलबार हिल, राज भवन, मुंबई ४०००३५ येथे दि. १२-९-२०२२ ते १६-९-२०२२ या कालावधीत दुपारी ३.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत निरीक्षणाकरिता उपलब्ध असतील. निविदा सादर करताना निविदाकाराने रोख रक्कम अथवा रु. १,०००/- चा (मुंबई येथे देय) धनादेश (ACCOUNTS OFFICER, RAJ BHAVAN MUMBAI) या नावाने सिलबंद निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे. अनामत रक्कम नसलेली निविदा रद्दबातल समजण्यात येईल.

अंतिम निविदा जाहिरात प्रसिद्धीच्या तारखेपासून ते दि. १९/०९/२०२२ रोजी दुपारी १.०० पर्यंत कार्यालयात स्विकारण्यात येतील व दि. १९/०९/२०२२ रोजी दुपारी ४.०० वा. सर्वांसमक्ष सिलबंद निविदा उघडण्यात येतील. निविदा अपेक्षित किंमतीपेक्षा कमी किंमतीची असल्यास सदर निविदा रद्द करण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखांनी राखून ठेवलेला आहे. प्रथम उच्चतम तीन निविदाकार (Highest-1, 2, 3) वगळता सर्व अयशस्वी निविदाकारांना त्यांची रोख रक्कम अथवा धनादेश परत करण्यात येतील. ज्या यशस्वी निविदाकाराची (Highest-1) निविदा स्विकारण्यात येईल त्यांनी उर्वरित रक्कम रोखीने अथवा NEFT द्वारे कार्यालयाच्या खात्यात भरुन दोन दिवसांत सदर दुचाकी वाहने नेणे बंधनकारक राहील अन्यथा अनामत रक्कम रु. १,०००/- जप्त करण्यात येईल व सदर मोटार सायकली या द्वितीय निविदाकारास (H-2) देऊ केल्या जातील.

GOVERNOR'S SECRETARIAT RAJ BHAVAN, MUMBAI

विक्रम वि. निकम
राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन)
राज भवन, मुंबई ४०००३५

# परिशिष्ट-१

**प्रति,**

**मा. राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन),**
राज्यपालांचे सचिव कार्यालय,
वाळकेश्वर मार्ग,मलबार हिल,
राज भवन, **मुंबई ४०००३५.**

**विषय :** **राज्यपाल सचिव कार्यालयाद्वारे लिलावाने विक्री करण्यात येणाऱ्या दोन मोटार सायकलींच्या खरेदीकरिता निविदा सादर करणे बाबत...**
**संदर्भ :** जाहिरात क्र. रा.स.का./२०२१/निर्लेखन/प्र.क्र.३७४/२४११ दि. ५ सप्टेंबर २०२२

**महोदय,**

माझी / आमची महिती खालील प्रमाणे असून, मी / आम्ही जाहिरात क्र. रा.स.का./२०२१/निर्लेखन/प्र.क्र.३७४/२४११ दि. ५ सप्टेंबर २०२२ रोजीच्या लिलावाच्या जाहिरातीस अनुसरून राज्यपाल सचिव कार्यालयातर्फे लिलावाद्वारे विक्री करण्यात येणाऱ्या दोन मोटार सायकलींच्या एकत्रित खरेदीकरिता, कार्यालयाच्या सर्व अटी व शर्तींच्या अधिन राहून जाहिरातीत नमूद दुचाकी वाहने खरेदी करण्याकरीता माझी निविदा सादर करीत आहे.

निविदाधारकाचे नाव : ____________________

संस्थेचे नाव : ____________________

GST क्र. :(असल्यास) | | | | | | | | | | | | | | | |

संपर्कासाठी पत्ता : ____________________
____________________
____________________

भ्रमणध्वनी क्र.: ____________________

धनादेश क्र.: ____________________

बँकेचे नाव : ____________________

शाखा : ____________________

| **अ. क्र.** | **वाहनाचा क्रमांक** | **कंपनी /मॉडेल** | **इंधन** | **निविदेची रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|
| १ | MH-01-AN-0026 | होंडा ॲक्टीवा | पेट्रोल | |
| २ | MH-01-AN-0027 | होंडा ॲक्टीवा | पेट्रोल | |

**निविदेची रक्कम अक्षरात**.................................................................................................
.................................................................................................................................

दिनांक : सप्टेंबर २०२२
ठिकाण : राज भवन, मुंबई

**निविदाकाराची स्वाक्षरी / संस्थेचा शिक्का**

## लिलाव विक्रीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) वाहन जेथे आहे. ज्या अवस्थेत आहे त्याच अवस्थेत घ्यावे लागेल.

२) ज्या संस्थेचा / व्यक्तीचा देकार मंजूर करण्यात येईल अशा संस्थांनी / व्यक्तींनी वाहन कार्यालयाच्या आवारातून बाहेर नेताना वाहतुकीचा, हमालीचा व इतर हाताळणीचा खर्च स्वतः सोसावयाचा आहे.

३) निर्लेखित वाहन कार्यालयीन इमारत / आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन मालमत्तेचे / वस्तूंचे नुकसान झाल्यास मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई संबंधित दरपत्रधारकाकडून रोखीच्या स्वरूपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.

४) ज्या संस्थेने / व्यक्तीने सादर केलेले लिलावाचे दर सर्वात जास्त असतील अशा पक्षकाराने लिलावाची संपूर्ण रक्कम दरपत्रके उघडल्यानंतर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी रोखीने अथवा NEFT व्दारे कार्यालयात भरणा करणे बंधनकारक राहील.

५) दरपत्रकासोबत इसारा ठेव (EMD) रूपये १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) रोखीने अथवा (मुंबई येथे देय) धनादेशाद्वारे (ACCOUNTS OFFICER, RAJ BHAVAN MUMBAI) या नावाने सादर करणे अनिवार्य आहे.

६) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्वीकृत करणे अथवा नाकारण्याचा अधिकार राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन) यांनी राखून ठेवला आहे.

७) सदर दरपत्रकाच्या अटी व शर्ती शिथीलक्षम करण्यास राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन) सक्षम आहेत. दरपत्रकाच्या अटी व शर्ती शिथीलक्षम करण्यास राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन) यांचा निर्णय अंतिम राहिल व तो दरपत्रक धारकावर बंधनकारक राहील.

८) सशर्त दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

९) दरपत्रके उघडल्यानंतर कार्यालयाने अंतिम केलेल्या हातच्या किंमतीपेक्षा (अपसेटप्राईस) जास्तीत जास्त दर नमुद केलेले देकार स्वीकृत केले जाईल.

१०) दरपत्रकधारकांची ईसारा ठेव (EMD) खालीलपैकी कोणत्याही प्रकरणी जप्त केली जाईल.
- (अ) दरपत्रक स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर दरपत्रक मागे घेतल्यास.
- (ब) दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर (मंजूर झाल्यानंतर) आवश्यक खरेदी किंमत स्वीकृतीच्या दुसऱ्या दिवसापर्यंत न भरल्यास.
- (क) रक्कम भरल्यानंतर यशस्वी दरपत्रक धारकाने वाहन ताब्यात घेण्यास नकार दिल्यास.

११) विहित मुदतीत रक्कम भरून वाहन ताब्यात न घेतल्यास संबंधितांचा देकार रद्द ठरवून विक्री अन्य पात्र संस्थेस / व्यक्तीस करण्याचे अधिकार राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन) यांनी राखून ठेवलेले आहेत.

१२) वस्तु व सेवा कर अधिनियमानुसार, यशस्वी दरपत्रकधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा शासनास सादर करावा लागेल.

१३) दरामध्ये तसेच दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पुर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन) यांनी राखून ठेवला आहे.

१४) शासकीय वाहनाच्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी दरपत्रकधारकास स्वखर्चाने करावी लागेल.

१५) **दरपत्रक सादर करण्याची पध्दत:-** दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीने सादर करावे.

**१५.१ (तांत्रिक लिफाफा) : -** (१) दरपत्रक धारक **फर्म किंवा संस्था असल्यास** (अ) संबंधीत शासकीय विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र (उदा. शॉप ऍक्ट रजिस्ट्रेशन (गुमास्ता)किंवा तत्सम रजिस्ट्रेशन) (ब) दरपत्रक धारकाचे दिनांक १९ सप्टेंबर २०२२ रोजी वैध असलेल्या जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (२) दरपत्रक धारकाचे पॅन कार्ड (३) इसारा ठेव (EMD) रोख रक्कम रूपये १,०००/-

**१५.२ लिफाफा क्रमांक - २ (आर्थिक देकार)** दरपत्रक धारकाने सोबतच्या विहित प्रपत्रात (परिशिष्ट- १) जास्तीत जास्त किंमतीचे देकार अंकी व अक्षरी नमुद करावेत तसेच स्वाक्षरी करून लिफाफा क्रमांक २ मध्ये सीलबंद करावा.

१६) वरील दोन्ही लिफाफे (तांत्रिक व आर्थिक) एका स्वतंत्र लिफाफयामध्ये (मुख्य लिफाफा) सीलबंद करून लिफाफ्यावर **"दुचाकी वाहने खरेदी करीता देकार"** असे ठळकपणे नमुद करावे. तसेच सदर मुख्य लिफाफा मा. राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन), राज्यपाल सचिव कार्यालय, मलबार हिल, वाळकेश्वर मार्ग, राज भवन, मुंबई - ४०० ०३५ यांना स्पीड पोस्टाने अग्रेषित करावा अथवा प्रत्यक्ष कार्यालयात आणून द्यावा. मुख्य लिफाफ्यावर दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेचे नाव, पत्ता, ई-मेल व संपर्कासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.

१७) **दरपत्रक उघडण्याची पध्दत :-** दरपत्रक उघडते वेळी प्रथम दरपत्रकाचा लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक) उघडण्यात येईल. सदर लिफाफ्या मधून विहित कागदपत्रांची पूर्तता केलेली नसल्यास दरपत्रक धारकाचा लिफाफा क्रमांक २ उघडला जाणार नाही.

१८) कोणतेही दर मंजुर वा रद्द करणे तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमीमांसा केली जाणार नाही.

१९) ज्या संस्था / व्यक्ती यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा संस्था / व्यक्तींनी लिलावात सहभागी होण्यासाठी आपले दर बंद लिफाफ्यातून राज्यपाल सचिव कार्यालयाच्या पत्यावर कोणत्याही परिस्थीतीत दिनांक १६/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा रितीने स्वत: उपस्थित राहून किंवा रजिस्टर / स्पीड पोस्टाने पाठवावे.

२०) **बंद लिफाफे उघडण्याची वेळ व दिनांक** :- बंद लिफाफे दि. **१९/०९/२०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता** राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन) यांच्या समक्ष उघडण्यात येतील. (सदर वेळ व दिनांकात बदल करण्याचे अधिकार राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन) राखून ठेवले आहेत. बंद लिफाफे उघडण्याची वेळ व दिनांक यात कार्यालयाच्या सोईस्तव बदल केला गेल्यास त्याबाबत संबंधिताना त्यांच्या दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांकावर कळविण्यात येईल.

२१) लिलाव विक्रीची सूचना, अटी व शर्ती राज्यपाल सचिव कार्यालयाच्या https://rajbhavan-maharashtra.gov.in/ मुख्यपृष्ठ=>कागदपत्रे=>जाहिरात या संकेतस्थळावर आणि महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in/1146/Tenders मुख्य पृष्ठ=>निविदा या संकेतस्थळावर सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत उपलब्ध आहे.